NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २६.११.२०२६ गुरूवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २५.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण ३,२३,८५०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, दिनांक २५.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये २६ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ७५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ५२ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १७५ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १०९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये २७ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०८ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १३७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २३ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९५५ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४ (सि) अन्वये १९ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २६ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७५१ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. २,६८,४००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) भांडेवाडी पोलीसांची कामगिरी :– गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २५.११.२०२६ चे २१.४५ वा. ते २३.२५ वा. चे दरम्यान, भांडेवाडी पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विक्री करणारे आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, न्यु सुरजनगर, भांडेवाडी येथे राहणारा ईसम आपले राहते घरासमोरील टिनाचे शेडमध्ये गांजा विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, घटनास्थळी गेले असता, तेथे एका टिनाचे शेडमध्ये एक इसम व एक मुलगा मिळुन आला. त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव सुरज संजय खोब्रागडे, वय ३२ वर्षे, रा. न्यु सुरज नगर, भांडेवाडी, नागपूर असे सांगीतले. दुसरा मुलगा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट

संशयावरून एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्यांची व त्यांचे ताब्यातील टिनाचे शेडची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात एका प्लॅस्टीक मध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १ किलो २७२ ग्रॅम मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा व दोन लोखंडी कोयते, एक बनावटी लाकडी मुठ असलेली छर्रे उडविणारा देशी कट्टा, ईलेक्ट्रीक वजनकाटा, लोखंडी बॅरल असलेली लायटर टॉय गन, छर्रे पॅकेट असा एकुण २०,१७०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकाचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकाविरूध्द पोलीस ठाणे भांडेवाडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकास त्याचे पालकाचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन चरडे, पोउपनि. दिपक चालुरकर, पोहवा. अश्वीन बडवे, दिनेश यादव, सुनिल वानेखेडे, मपोहवा. रेखा झाडे, पुनम सेवतकर, पोअं. सचिन दुबे, भुषण झरकर, मिलींद ठाकरे, मोहन रेहपाडे व अनिल कलींदर यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे मानकापुर :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १२.११.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत प्रशांत नगर, प्लॉट नं. ४०, सिआयडी ऑफीस जवळ, मानकापुर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी जॉन्सन ज्युवेल मानवेल, वय ५७ वर्षे यांनी त्यांचे सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती २,६४,०००/—रू. चा मुद्देमाल एका बॉक्समध्ये ठेवुन, राहते घरातील ड्रेसिंग टेबलचे एका ड्रॉव्हरमध्ये तो बॉक्स ठेवुन, ड्रेसिंग टेबलला लॉक करून ठेवले व लॉकची चाबी ड्रेसिंग टेबलवर ठेवली होती. फिर्यादी यांनी दिनांक २४.११.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास नमुद दागिन्यांचा बॉक्स ठेवलेल्या जागी पाहणी केली असता, त्यांना नमुद मुद्देमाल दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घरातील ड्रेसिंग टेबलवरील चाबीने ड्रॉव्हर उघडुन, त्यातील सोन्या—चांदीचा बॉक्स चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिनांक २५.११.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोहवा. रविकांत सिंह ९५१८९८३८७८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०८.११.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे रविंद्र नारायण रामटेके, वय ५६ वर्षे, रा. रमाबाई आंबेडकर नगर, सिध्दार्थ बुध्दविहार जवळ, जयताळा, एमआयडीसी, नागपूर हे आपले नातवंडांना घेवुन पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, जयताळा आखरी बस स्टॉप येथुन पायदळ जात असतांना, एका बुलेट दुचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांना धडक दिल्याने, त्यांचे मांडीला मार लागुन ते गंभीर जखमी झाले. बुलेट चालक अपघात करून घटनास्थळावरून पळुन गेला. गंभीर जखमी फिर्यादीचे वडीलांचा उपचार सुरूवातीला लता मंगेशकर हॉस्पीटल व तेथुन एम्स हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी स्वप्नील रविंद्र रामटेके, वय २० वर्षे यांनी त्यांचे जखमी वडीलांचा उपचार पुर्ण करून, दिनांक २५.११.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. शशीकांत तायडे ८२०८०६००५४ यांनी बलेट दुचाकी चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे एमआयडीसी :– फिर्यादी जयेंद्र निलकंठ भोयर, वय ३६ वर्षे, रा. मातोश्री नगर, हिंगणा रोड, शुक्लाचे घरी किरायाने, एमआयडीसी, नागपुर हे त्यांचा मित्र नामे प्रशांत वामन उके, वय २५ वर्षे, रा. वार्ड नं. २, शिवमंदीर जवळ, अमर नगर, एमआयडीसी, नागपुर यास त्याचे घरी सोडण्याकरीता मोटारसायकलने त्याचे मागे बसुन जात असतांना, दिनांक २५.११.२०२६ चे २१.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, अमर नगर टर्निंग, मानकर सलुनचे गल्लीमध्ये समोरून गाडी येत असल्याने, फिर्यादीचा मित्र प्रशांत याने त्याची मोटारसायकल बाजुला थांबविली असता, एक अनोळखी २२ ते २५ वर्षीय इसमाने शिवीगाळी करून, प्रशांत सोबत वाद–विवाद करून, त्यास जोराने धक्का दिल्याने प्रशांत उके हा डोक्याचे भारावर रोडवर खाली पडुन बेशुध्द झाला. फिर्यादी यांनी लोकांचे मदतीने त्यास उपचाराकरीता शालीनीताई मेघे हॉस्पीटल, वानाडोंगरी येथे नेले असता, उपचारादरम्यान २३.०० वा. डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. शशीकांत तायडे ८२०८०६००५४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.